॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्र पेटी क्र. 80, जळगाव - 425001 ☎:(0257) 2257291 , 297

## T.Y.B.A. English "Communication Skill" (A.E.C.)

# पुस्तकाच्या छपाई व प्रकाशन बाबतची फेर निविदा सूचना

विद्यापीठास **T.Y.B.A. English "Communication Skill"** (A.E.C.) चे पाठ्यपुस्तक छपाई व प्रकाशन करावयाचे आहे. त्यासाठी नामांकित प्रकाशकांकडून **सिलबंद फेर निविदा** मागविण्यात येत आहेत. त्यासाठी लागणाऱ्या कोऱ्या निविदा संपूर्ण अटी व शर्तीसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (website http://www.nmu.ac.in) उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. निविदेसोबत निविदा किंमत रु. 500/- (ना परतावा) व बयाणा रु. 10,000/- चा स्वतंत्र धनाकर्ष (राष्ट्रीय कृत बँकेचा) वित्त व लेखाधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या नावाने पाठविणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदा स्विकारण्यात येणार नाही. भरलेली **सिलबंद निविदा दि.12/3/2021 पर्यंत** विद्यापीठ कार्यालयीन वेळेत कामकाजाच्या दिवशी स्विकारण्यात येईल. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचा किंवा फेटाळण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

ठिकाण : जळगाव

दिनांक : 17/2/2021

**(एस.आर. गोहिल)**
**प्र. वित्त व लेखाधिकारी**

T.Y.B.A. English

**या विषयाच्या "Communication skill " (A.E.C) पाठय पुस्तकाच्या छपाई, प्रकाशन व विक्री बाबतच्या अटी व शर्ती**

**टी.वाय.बी.ए "Communication skill " (A.E.C)**
**( w.e.f June 2020 )**

| | |
|---|---|
| पुस्तकाचे शिर्षक | : Communication skill (A.E.C) |
| पान संख्या | : 134 (वाढू अगर कमी होऊ शकतात) |
| पुस्तकाचा आकार | : 1/8 डेमी |
| पहिली आवृत्ती | : 5000 प्रतींची |
| पुस्तकाचा कागद | : निविदेसोबत जोडावा |
| मुख पृष्ठ | : कल्पना / रेखाटन यथा अवकाशाने दिले जाईल. ( खाली नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून) |

*** निविदेच्या अटी व शर्ती ***

१. निविदा मंजूर झालेल्या प्रकाशन संस्थेस विद्यापीठाशी करार करावा लागेल.

२. इंग्रजी अभ्यासमंडळ (क.ब.चौ.उ.म.वि.) यांनी नियुक्त केलेल्या संपादन मंडळाचे संपादीत केलेले पाठ्यपुस्तकच प्रकाशीत करावे लागेल. पाठ्यपुस्तक लिहीणा-या Unit Writers ची नावे पुस्तकात समाविष्ट करण्यात येतिल व मागील पानावर इंग्रजी अभ्यासमंडळ सदस्यांची यादी असेल.

३. सदर प्रकाशन स्वखर्चाने सदर पाठ्यपुस्तकांची छपाई आणि वितरण यांची व्यवस्था सांभाळेल. वितरण व्यवस्था धुळे, नंदुरबार व जळगाव या तिन्ही जिल्ह्यांसाठी मुख्यत्वे असली तरी त्या अर्थाने भौगोलिक मर्यादा वितरणासाठी नसतील मात्र सदर पुस्तक त्वरीत छापून प्रकाशीत व वितरीत करण्याची जबाबदारी प्रकाशकांची असेल.

४. प्रकाशनाचे सर्व हक्क विद्यापीठाच्या आधीन राहतील.

५. संपादक मंडळाच्या वतीने छपाईस योग्य अशी प्रत सी.डी.सह प्रकाशकास दिली जाईल. सदर सी.डी.वरुन प्रथम प्रत (First Hard Copy) प्रुफ रिडींगसाठी प्रकाशक उपलब्ध करुन देतील. दुसरी प्रत आवश्यक व सूचविलेल्या दुरुस्त्यांसह प्रुफ रिर्डीगसाठी प्रकाशक उपलब्ध करुन देतील.दुस-या प्रतीचे प्रुफ रिर्डीग झाल्यावर छपाई योग्य (Dummy) प्रत ( तिसरी प्रत) प्रकाशक देतील. सदर प्रत संपादन मंडळाने तपासून दिल्यानंतर अंतिम छपाईचे काम प्रकाशकांना करता येईल. हे सर्व काम विहीत कालखंडात (Stipulated period) करणे प्रकाशकावर बंधनकारक राहील.

६. सदर प्रकाशकांतर्फे दरवर्षी विक्री झालेल्या प्रतींच्या संख्येवर निर्धारीत रॉयल्टी, योग्य त्या अटींच्या आधिन राहून विद्यापीठास अदा करावी लागेल.

७. सदर प्रकाशकास दरवर्षी Statement of Sales तयार करुन ३१ डिसेंबर अखेर वित्त व लेखाधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या नावे रॉयल्टीचा धनादेश जमा करावा लागेल.

K.B.C.NORTH MAHARASHTRA UNIVERSITY JALGAON-425001(INDIA)

८. दुस-या आवृत्तीच्या प्रकाशनार्थ आवश्यक प्रतींची संख्या विद्यापीठाच्या पूर्व संमतीने निर्धारीत करुन सदर पाठ्यपुस्तक आवश्यक त्या दुरुस्त्यांसह छापणे सदर प्रकाशकास बंधनकारक राहील. मात्र पुस्तकांच्या छापील किंमतीत कोणतीही वाढ करण्यात येणार नाही.

९. संपादन मंडळाच्या प्रत्येक सदस्याला प्रत्येकी ०३ प्रती व इंग्रजी अभ्यास मंडळाच्या प्रत्येक सदस्याला १ प्रत आणि अभ्यासमंडळ अध्यक्षांना ५० प्रती Gratis copies म्हणून तर विद्यापीठाला एकूण २५ प्रती नि:शुल्क द्याव्या लागतील.

१०. विद्यापीठाने सदर पाठ्यपुस्तक वितरणातून मागे घेतल्यास सदर प्रकाशकास विना नुकसान भरपाई केवळ तीन महिन्यांची लेखी सूचना देणे विद्यापीठास आवश्यक राहील.

११. प्रकाशक अथवा विद्यापीठातर्फे कराराचे उल्लंघन झाल्यास अथवा मतभेद झाल्यास मे. जळगाव न्यायालयाच्या कक्षेत सदर बाब सादर करण्याचा हक्क दोघांनाही राहील.

१२. विक्री न झालेल्या पुस्तकांची छपाईची अगर त्यावरील इतर कोणत्याही खर्चाची जबाबदारी विद्यापीठावर राहणार नाही.

१३. निविदेसोबत बयाणा रक्कम रु.१०,०००/- व निविदा किंमत रु.५००/- चे स्वतंत्र धनाकर्ष प्र.वित्त व लेखाधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या नावाने निविदेसोबत पाठविणे आवश्यक आहे. त्याशिवाय सादर केलेली निविदा विचारार्थ घेण्यात येणार नाही.

१४. सदरच्या पाठयपुस्तकाचे मुखपृष्ठ निश्चित करण्यापुर्वी प्रकाशकाने ०२ रेखाटने / कल्पना चित्र पाठयपुस्तकाच्या संपादक मंडळास दाखवून त्यांच्या मान्यतेनुसार अंतिम मुखपृष्ठ निश्चित करायाचे आहे.

१५. सुरक्षा अनामत ज्या छपाईदारास / प्रकाशकास पुस्तक छपाई व प्रकाशनाचे काम दिले जाईल, त्याने पत्र मिळाल्यापासून ०७ दिवसाच्या आत सुरक्षा अनामत रक्कम रु.२५,०००/- रोख किंवा प्र.वित्त व लेखाधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या नावाचा धनाकर्ष भरणे आवश्यक आहे. सदर रक्कमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. दिलेल्या मुदतीत सुरक्षा अनामत न भरल्यास निविदेसोबत भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. छपाई व पुस्तक छपाई व प्रकाशनाचे काम दुस-या छपाईदारास दिले जाईल, त्याचप्रमाणे सुरक्षा अनामत भरल्यानंतर छपाईदाराने / प्रकाशकाने पुस्तक छपाई बाबत टाळाटाळ, विलंब केल्यास किंवा पुस्तक छपाई व प्रकाशनास नकार दिल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१६. **निविदेत पुस्तक विक्रीची किंमत व विक्री झालेल्या पुस्तकांवर द्यावयाच्या रॉयल्टीबाबत (दराबाबत) स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.**

१७. **वरील अटी व शर्ती मान्य असल्यास आपली निविदा संस्थेच्या लेटर हेडवर बयाणा रक्कमेसह दि. १२/०३/२०२१ किंवा तत्पूर्वी विद्यापीठ कार्यालयास कार्यालयीन वेळेस दुपारी ०५.४० पर्यंत विद्यापीठाच्या आवक विभागात जमा करावी. आपली निविदा सिलबंद पाकीटात जमा बंद करुन पाकीटावर "T.Y.B.A. English "Communication skill " (A.E.C) या पुस्तकाच्या छपाई प्रकाशन व विक्रीची निविदा " असा उल्लेख करावा त्याचप्रमाणे पाकीटावर बयाणा रक्कम भरल्याचा धनाकर्ष क्रमांक नमूद करावा.**

१८. कोणतीही निविदा स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा संपूर्ण अधिकार कोणतेही कारण न देता विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

ठिकाण :- जळगाव
दिनांक : १७/०२/२०२१

K.B.C. NORTH MAHARASHTRA UNIVERSITY JALGAON-425001 (INDIA)

( सोमनाथ र. गोहिल )
**प्र. वित्त व लेखा अधिकारी**

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

पत्र पेटी क्र. ८०, जळगाव- ४२५ ००१ दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२९१, २९७

T.Y.B.A. English "Communication skill "(A.E.C) Book
या पुस्तकाची छपाई, प्रकाशन व विक्री बाबतची निविदा

निविदा धारकाचे नाव :-______________________________

पूर्ण पत्ता :-______________________________

______________________________

______________________________

दूरध्वनी क्र. ______________________________

निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ : 12.03.2021, 05.40 पर्यंत

K.B.C.NORTH MAHARASHTRA UNIVERSITY JALGAON-425001(INDIA)

किंमत रु.500/-